**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**

**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**

**Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024**

# संत तुकारामांच्या अभंगातील संत महिमा

**प्रा. डॉ. आशा सोपान गिरी**

मराठी विभाग कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय परभणी.

**प्रस्तावना-:** महाराष्ट्राला संतांची भूमी म्हटले जाते. अनेक संत महाराष्ट्रात होऊन गेले. वारकरी संप्रदायातील सर्वच संतांनी समाजाच्या नवनिर्माणासाठी केलेले कार्य, समाजाच्या जडणघडणीत दिलेले योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे.संत साहित्याचा विचार करताना तत्कालीन समाज जीवन पाहणे सुद्धा आवश्यक ठरते."मध्ययुगीन कालखंड हा मराठी साहित्यात प्रबोधन कालखंड म्हणून या कालखंडास अतिशय महत्त्वाचे स्थान आहे ह्या कालखंडात महानुभाव, वारकरी, नाथ, दत्त ,वीरशैव, पंडित इत्यादी संप्रदाय आपल्या साहित्यातून समाज प्रबोधनाचे काम मोठ्या निष्ठेने करत होते" (१) संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव, संत रामदास तर संत कवयित्री मध्ये संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सोयराबाई यासारख्या सर्व संतांनी आपल्या अभंग वाणीतून लोकांना उद्बोधन केले आपल्या प्रतिभा शक्तीने समाजाला जागृत करण्याचे कार्य केले.

संत तुकारामांनी म्हटले आहेच की

बुडता हे जन न देखवे डोळा
येतो कळवळा म्हणवोनी.

अशाच प्रकारची भूमिका सर्वच संतांनी समाजाच्या बाबतीत घेतलेली आहे. तेराव्या शतकामध्ये समाजामध्ये धार्मिक आणि सामाजिक प्रबोधन संतांनी घडवून आणले. भक्ती मार्गामध्ये समानता रुजविण्याचा प्रयत्न केला. समाजासाठी चांगले काम करायचे म्हटले तरी समाज ते मान्य करत नाही .अनेक विरोधक तयार होतात. संतांनाही विरोध झाला ,प्रसंगी त्यांचा छळही झाला. तरी ते मागे हटले नाहीत त्यांनी आपले कार्य चालूच ठेवले, त्यांनी समाजमन बदलविण्याचे समाजातील अनिष्ट रूढी प्रथा परंपरा यांना मोडीत काढण्याचे प्रयत्न केले.

संत तुकारामांनी खरे संत कोणास म्हणावे किंवा खरा संत कसा असतो हे सांगण्यासाठी अनेक अभंग लिहिले आहेत. संतांचा महिमाच त्यांनी आपल्या अभंगातून वर्णन केला आहे.

हिरा ठेविता ऐरणी | वांचे मारिता जो घणी ||१||
तोची मोल पावे खरा| करणीचा होय चुरा ||२||

(अभंग २५, पृष्ठ क्र.१४) या अभंगांमध्ये खरे संत कसे असतात हे सांगताना संत तुकाराम हिऱ्याचे उदाहरण देऊन म्हणतात की हिरा हा ऐरणीवर ठेवून घनाने जरी त्याच्यावर वार केले तरी

त्याला काहीच होत नाही. परंतु जो फक्त हिऱ्यासारखा चमकतो पण खरा हिरा नसतो .त्याच्यावर घण मारला की त्याचा चुरा होतो. परंतु संत हे खऱ्या हिऱ्यासारखे असतात. किंवा मोहरा जो असतो त्याच्याभोवती सूत गुंडाळून विस्तवात टाकले असता त्याच्या संगतीमुळे सूत जळत नाही. तोच खरा मोहरा. त्याचप्रमाणे जे संत असतात ते जगाचे आघात सोसतात, सहन करतात त्यांच्य अपराध पोटात घालतात. तेच खरे संत होय.

जे का रंजले गांज | त्यासी म्हणे जो आपुले ||१||

तोची साधू ओळखावा |देव तेथेच जाणावा ||२|| (अभंग २०४, पृ.४७)

जो दु:खी कष्टी जणांचे दु:ख निवारण्यासाठी झटतो ,तळमळतो तोच खरा साधू आहे. आणि अशा साधू, संतांपेक्षा देवही वेगळा नसतो. जसे मऊ लोणी आतही आणि बाहेरही मऊच असते. त्याचप्रमाणे संतांचे मन असते. जे आपल्या पुत्राप्रमाणे दास, दासींना, नोकऱ्यांना वागवितो तोच खरा संत. देव शोधण्यासाठी लोक भटकत राहतात परंतु जे दीनदुबळ्या आधार देणारे संत आहेत ते देवा पेक्षा वेगळे नसतात. त्यांच्यातच देव असतो.

संतांचा महिमा तो बहु दुर्गम|

शाब्दिकांचे काम नाही येथे ||१|| (अभंग ८१८, पृ.१५६.)

संतांचा महिमा हा अवर्णनीय आहे. शब्दांचे काम तेथे चालत नाही. कोणी कितीही संतपणाचा आव आणला तरी तो खरा संत नसतो. हे समजावताना तुकाराम महाराज म्हणतात की गाई आणि म्हशीने कितीही दूध दिले तरी ती काही कामधेनू होणार नाही. त्यामुळे देखावा करणारे, वर वर बोलणारे संत होऊच शकत नाहीत.

नाही संतपण मिळत हे हाटी

हिंडता कापाटी रानी वनी ||१|| (अभंग ८१९ पृष्ठ१५६).

संतपण हे काही बाजारातून विकत घेता येत नाही. किंवा मिळत नाही. कितीही रानी वनी हिंडणारे लोक असतील तेही काही संत होत नाहीत. म्हणजेच रानावनात हिंडले घर सोडून दिले म्हणजे संत होता येते असे नाही

घेसी तरी घेई संतांची हे भेटी

आणिक ते गोष्टी नको मना ||१|| अभंग ८५५, पृष्ठ१६३.)

संत तुकाराम मनाला सांगतात की तू फक्त संतांची भेट घे. आणखी दुसरे काही नको. संतांचे सर्व भांडवलंच देव असते. देवाशिवाय ते दुसरे काही बोलतही नाहीत. आणि अशा संतांना भेटल्यावर मनालाही विसावा मिळतो. कारण हे संत सुखाचे सागर असतात. त्यामुळे मनाला त्यांच्या सानिध्यातच तुला सुख आणि समाधान प्राप्त होईल.

**संत तुकारामांच्या अभंगातील संत महिमा**

**प्रा. डॉ. आशा सोपान गिरी**

संतासी तो नाही सन्मानाची चाड
परी पडे द्वाड अव्हेरी तो ||१||

संतांना सन्मानाची ,मानपाणची कसलीही अपेक्षा नसते. जे दुष्ट आहेत ते त्यांचा दुस्वास करतात. परंतु त्यांना त्याचाही काही फरक पडत नसतो. ते सन्मानासाठी चांगले काम करत नाहीत. लोकांसाठी त्यांच्या मनात कळवळ अस म्हणून ते चांगले काम करतात .

गंगा आली आम्हावरी| संत पाऊले साजिरी ||१||
तेथें करीन अंघोळी | उडे चरणरज धुळी |
येती तीर्थावळी पर्वकाळ सकळ ||२|| (अभंग १५४४, पृ.२८७)

गंगा स्वतःच घरी आल्याचे सुख संत घरी आल्यावर होते. संत घरी आल्याने त्यांच्या पायाच्या धुळीचे महत्त्व सर्व तीर्थांसारखे आहे. संत सर्वतीर्थ, पर्वकाळ यांच्यासारखे आहेत. त्यांचे पाय घराला जरी लागले तरी सर्व पाप जळून जाते. दु:ख दूर जाते. संत तुकाराम संतांना सागराची उपमा देतात

तुम्ही संत मायबाप कृपावंत |
काय मी पतित कीर्ती वाणूं |
अवतार तुम्हां धराया कारण |
उद्धारावे जन जड जीव ||२|| (अभंग २४२५, पृष्ठ ४५०.)

संत हे मायबापा सारखे असतात. कृपाळू असतात. त्यांचा जन्मच हा जगाला उद्धारण्यासाठी झाला असतो. ज्याप्रमाणे चंदनाच्या अंगी गुण असतात तसेच संतांच्याही अंगी गुण असतात. व संपूर्ण जगाला शीतलता प्रदान करण्याचे कार्य संत करतात.

काय सांगो आता संतांचे उपकार | मज निरंतर जागविती ||१||
काय द्यावें त्यांसी व्हावे उतराई| ठेवितां हा पायी जीव थोडा ||२||(अभंग २८१४, पृ.५१८)

संतांचे समाजावर खूप उपकार असतात. त्यांच्या उपकारातून उतराई होणे शक्य नाही. त्यांच्या पायी जीव जरी गहाण ठेवला तरी कमीच आहे. म्हणजे जीवनाचे मोलही कमीच आहे. सहज बोलून ते उपदेश करतात, शिकवितात. ज्याप्रमाणे गाय वासराला प्रेमाने सांभाळते तसेच संत सर्वांना सांभाळून घेतात.

***निष्कर्ष***

१) सर्वच संत हे फक्त आध्यात्मिक जीवनाबद्दल मार्गदर्शन करून थांबले नाहीत तर त्यांनी समाज घडविण्याचे कार्य केले.

**संत तुकारामांच्या अभंगातील संत महिमा**

**प्रा. डॉ. आशा सोपान गिरी**

२) तत्कालीन समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य करत संतांनी समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा, अनेक दैवतवाद,भोंदूपणा, असमानता यांच्या विरोधात समाजामध्ये जाणीव जागृती निर्माण केली.

३) समाजाला खऱ्या धर्माची ओळख पटवून देण्याचे कार्य केले.

४) संतांनी आपल्या वाणीने,
लेखणीने आणि कृतीने भागवत धर्माचे पुनरुजीवन केले.

५) समाजामध्ये बंधुभावाची शिकवण देत समाजाला एकरूप करण्याचा प्रयत्न तसेच त्याची अस्मिता जागविण्याचा प्रयत्न संतांनी केला.

६) संत तुकारामांना खऱ्या संतांची वरील वैशिष्ट्ये माहीत होती, त्यामुळे त्यांनी आपल्या अभंगातून संत महिमा वर्णन केला आहे

**समारोप** : संत हे विवेकवादी, विज्ञानवादी आणि काळाच्याही पुढे जाणारे समाज सुधारक होते. अंधश्रद्धांच्या, अज्ञानाच्या आहारी गेलेल्या समाजाला जागे करण्याचे व स्वतःला ओळखण्याचे भान संतांनी आपल्या अभंग वाणीतून दिले. संत हे फक्त ईश्वरापुरतेच म्हणजे फक्त अध्यात्मक क्षेत्राशीच निगडित नव्हते. तर त्यांनी समाजाला आपल्या साहित्यातून योग्य दिशा देण्याचे कार्य केले. सामान्य माणसाला समतेचे स्वप्न दाखविले. जगण्याचा सहज सोपा व अध्यात्माचा मार्ग दाखविला. सामान्य माणसाला भरकटण्यापासून वाचविले, त्याला योग्य दिशा दिली. समाजाला एकसंघ करण्याचे एकत्र आणण्याचे काम त्या काळात संतांनीच केले, परंतु खोट्या संतांचा, स्वतःला संत म्हणून घेणारांचा खूप सुळसुळाट तेव्हाही झाला होता. आणि सर्व सामान्य माणसे त्याला फसण्याची शक्यता होती. म्हणून संत तुकारामांनी खरे संत कसे असतात हे त्यांच्या अभंग वाणीतून लोकांना सांगितले.

*** संदर्भ ग्रंथ ***

१) अर्चना सोनवणे (संपा.) संत कवयित्री, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती २० ऑक्टोबर २०१४, पृ. २७

२) श्री तुकाराम महाराजांची गाथा (पारायण प्रत) गीताप्रेस, गोरखपुर.

## संत तुकारामांच्या अभंगातील संत महिमा

**प्रा. डॉ. आशा सोपान गिरी**